*महाराष्ट्र शासन वि. सुशांत*
*निशाणी क्र. २७*

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – आदिनाथ शांताराम बिले

माझे वय – ४० वर्षे,

व्यवसाय – फेरी विक्रेता

रा.ने. – कोळंब, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती यु.आर.हेरवाडे यांचे मार्फत</u>**

०१. दि. २४/०२/२०२१ रोजी पोलीसांनी मला कांदळगावकर यांच्या घरी सीसीटीव्ही काढण्यासाठी बोलविले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष त्या ठिकाणी भांडण झाल्याबाबतचा पंचनामा केला होता. पोलीसांनी मला घटनास्थळ दाखविले होते. घटनास्थळ हे कांदळगावकर यांच्या घराच्या बाजूला होते. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. अ.क्र. २ ला माझी सही आहे. माझी कोऱ्या कागदावरती सही घेतली होती, त्यामुळे मला पंचनाम्यातील मजकूराबाबत सांगता येत नाही.

**<u>साक्षीदार हा त्याच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली त्यानुसार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला दि. २४/०२/२०२१ रोजी धुरीवाडा येथे घर क्र. २०४४/अ येथे बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रुपा कांदळगावकर यांनी दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे फिर्यादीच्या घराच्या पाठीमागील बाजूस होते. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळावरती घटनेबाबतची माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहेकी, फिर्यादी व आरोपीचे घर यांच्यामध्ये साधारणपणे २० ते २५ फूटाचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पाठीमागील बाजूस संजय आचरेकर यांचे घर व परिसर आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे

पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा केला व त्यावर मी सही केली होती. हे मला माहिती नाही की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होवू नये म्हणून खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.के.परुळेकर यांचे मार्फत.</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, रुपा कांदळगावकर व सुधिर कांदळगावकर यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांचे मालवण दिवाणी न्यायालयाच्या शेजारी टायपिंग व झेरॉक्सचे सेंटर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मंगल दिवाकर जामसंडेकर ही सुधीर कांदळगावकर यांच्या टायपिंग सेंटरमध्ये कामाला होती. मला पंचनाम्याला येण्याकरीता सुधीर कांदळकर यांनी फोन केला होता. मला त्यांनी किती तारखेला फोन केला होता हे लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला किती तारखेला बोलविले होते व पंचनामा किती तारखेला झाला होता हे माझ्या लक्षात नाही. मला दुपारी १२.३० वा. पंचनाम्याला येण्याकरीता फोन आला होता. मला ज्यावेळी फोन आला होता त्यावेळी मी माझ्या घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांच्याशी माझे चांगले संबंध असल्यामुळे मी पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने पोलीसांना घटनास्थळ दाखविले व त्याप्रमाणे पाहणी करुन मी पोलीसांना घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर सांगितला असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना फिर्यादीने घटनास्थळ दाखविले व त्याप्रमाणे पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा केला होता असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांचा आईस्क्रीमचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांनी त्यांच्या घराशेजारी आईस्क्रीम स्टोअरेजसाठी युनीट सुरु केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा आईस्क्रीम फेरी करुन विक्री करण्याचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, आईस्क्रीम खरेदी करण्यासाठी मी पुर्वीपासून सुधीर कांदळगावकर यांच्या घरी जाणेयेणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर व आरोपी यांच्या घराच्यामध्ये साधारणपणे १० फूट उंचीचा दगडी गडगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांच्या घराशेजारी त्यांच्या जागेमध्ये पर्यटनासाठी बांधलेली दुमजली इमारत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांच्या

जागेमध्ये पयर्टनासाठी असलेली दुमजली इमारत, सुधीर कांदळगावकर यांचे घर, त्याच्या बाजूला आईस्क्रीमचे शेड व त्यानंतर संडास बाथरुम अशा इमारती आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १४/०१/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण**.**